प्रेस नोट दिनांक ०४/१०/२०१७

**संघटित गुन्हेगारी विरोधी पथक, उत्तर विभाग, गुन्हे शाखा, पुणे शहर पथकाकडून दरोडा, रॉबरी, वाहनचोरी, खुनाचा प्रयत्न करणारे सराईत गुन्हेगारांना ३ गावठी पिस्टल, २ गावठी कट्टे व ११ जिवंत काडतूसे असे एकूण कि.रु. १,५६,४००/- चे अग्निशस्त्रांसह अटक**

दिनांक २४/०९/२०१७ रोजी संघटित गुन्हेगारी विरोधी पथक, उत्तर विभागमधील पो.ना. तानाजी गाडे व अतुल मेंगे यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, इसम नामे अर्जुन शिवाजी साबळे, वय ३५ वर्षे, रा. मु. साबळे वस्ती, पोस्टे बहुळ, ता. खेड, जि. पुणे हा एस.टी. वर्कशॉपजवळ, **दापोडी, पुणे** येथे गावठी पिस्टल विक्रीस घेऊन येणार असल्याची खात्रीशीर बातमी मिळाल्याने पोलीस निरीक्षक श्री ब्रम्हानंद नाईकवाडी यांना बातमीचा आशय कळवून त्यांनी वरिष्ठांची पूर्व परवानगी घेऊन स्टाफसह सदर ठिकाणी सापळा रचून त्यास पकडून त्याचे ताब्यातून (१) एक देशी बनावटीचे लोखंडी पिस्टल व तीन जिवंत काडतूसे व एक गावठी लोखंडी कट्टा व दोन जिवंत काडतूसे जप्त करुन त्यास अटक करुन भोसरी पोलीस स्टेशन, गुरनं. ४२०/१७, आर्म ॲक्ट कलम ३(२५), ५(२५) व म.पो.का.कलम ३७(१) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. तपासामध्ये त्याचेकडून त्याने विक्रीसाठी आणखी (२) एक गावठी पिस्टल व दोन जिवंत काडतूसे बिबवेवाडी येथे लपवून ठेवलेले काढून दिले व (३) त्याचा ओळखीचा इसम नामे निखील देवानंद पाटील, वय २१ वर्षे, रा. लोणीकंद, ता. हवेली, जि. पुणे यास विकलेले आणखी एक गावठी पिस्टल व दोन जिवंत काडतूसे व एक गावठी कट्टा, दोन जिवंत काडतूसे एकूण तीन पिस्टल त्याची सात जिवंत काडतूसे व दोन गावठी कट्टे त्याचे चार जिवंत काडतूसे असे एकूण पाच घातक अग्निशस्त्रे व अकरा जिवंत काडतूसे किं.रु. १,५६,४००/- ची जप्त करण्यात आलेली आहेत.

**यातील आरोपीकडून जप्त करण्यात आलेली वर नमूद सर्व अग्निशस्त्रे ही त्याने गुन्हयातील फरारी आरोपी देवीसिंह सरदारसिंह, रा. सिगनूर, ता. गोगावा, जि. खरगोन, राज्य मध्य प्रदेश याचेकडून विकत आणलेले आहेत.**

वर नमूद आरोपी याचेविरुध्द खालीलप्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

१) विश्रामबाग पोस्टे, गुरनं. ३२२८/०४, भादवि क. १४३,३४१
२) डेक्कन पोस्टे, गुरनं. ६८३/०७, भादवि क. ३९५, ३९७, ३८४, ३४
३) बंडगार्डन पोस्टे, गुरनं. २८१/०९, भादवि क. ३७९
४) बंडगार्डन पोस्टे, गुरनं. ३००/०९, भादवि क. ३७९
५) भोसरी पोस्टे, गुरनं. १८५/११, भादवि क. ३९२, ३४
६) विमानतळ पोस्टे, गुरनं. ३१३७/१२, आर्म ॲक्ट ३(२५), ५(२५)
७) खडक पोस्टे, गुरनं. ३०५६/१४, आर्म ॲक्ट ४(२५)
८) अलंकार पोस्टे, गुरनं. ४५/१७, भादवि क. ३०७, ३४, आर्म ॲक्ट ३(२५) असे एकूण ८ गुन्हे दाखल आहेत. **सदरचा आरोपी हा सध्या अलंकार पोस्टेकडील गुन्हयात अटक आहे.**

तसेच आरोपी नामे निखील देवानंद पाटील याचेविरुध्द दाखल गुन्हे

१) लोणीकंद पोस्टे, गुरनं. ४२६/१७, भादवि क. ३०७, आर्म ॲक्ट ४(२५)

सदरची कारवाई ही मा. अपर पोलीस आयुक्त, श्री प्रदीप देशपांडे सो, मा. पोलीस उप-आयुक्त, गुन्हे श्री पंकज डहाणे सो, मा. सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे-२, श्री संजय निकम यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री ब्रम्हानंद नाईकवाडी, सपोनि गणेश पवार, पोउनिरी. पी.डी.गायकवाड, पोलीस कर्मचारी राज देशमुख, हजरत पठाण, भालचंद्र बोरकर, दिपक भुजबळ, तानाजी गाडे, अतुल मेंगे, दत्ता फुलसुंदर, कांतीलाल बनसुडे, राजू मोरे, सोनावणे, पांडूळे, रमेश भिसे, विठ्ठल बंडगर, नवनाथ चांदणे, दिनेश साबळे, चापोना शितल शिंदे यांनी केली आहे.




संघटित गुन्हेगारी विरोधी पथक,उत्तर विभाग,गुन्हे शाखा,पुणे शहर